

Vidya Prasarak Mandal's
DR. GHALI COLLEGE
GADHINGLAJ
Affiliated to Shivaji University

# DR.GHALI COLLEGE, KOLHAPUR

# Criterion: 7

# Institutional Values and Best Practices

**7.1.4 Describe the Institutional efforts/initiatives in providing an inclusive environment i.e., tolerance and harmony towards cultural, regional, linguistic, communal socioeconomic and Sensitization of students and employees to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens**

## MARATHI RAJBHASHA GAURAV DIN

Dr. S. A. Masti
(Co-ordinator IQAC)

Dr. Ghali College Estd. 1984 Gadhinglaj

Principal
Dr. Ghali College
Gadhinglaj, Dist. Kolhapur

(74)



Dr. Ghali College, Gadhinglaj

Internal Quality Assurance Cell (IQAC)

Dr. GHALI COLLEGE Estd. 1984 GADHINGLAJ

==========================================

Report of Activity

(Extra curricular)

## Name of the activity मराठी राजभाषा दिन

Date: 27. 02. 2023

Time: 9.00 am. to. 10.30 am

Venue Dr. Ghali College, Gadhinglaj.

Name of Coordinator/Head/ Convener:

Details of the activity: (Name of the resource person, number of subtends and teachers Benefited……..including male and female participation etc short Description of programme)

निबंध स्पर्धा पारितोषिक वितरण आणि व्याख्यान.
अध्यक्ष प्राचार्य मंगलकुमार पाटील.

Signature and Name (Dr. D. M. Patil)

( ~~Head/Convener/~~coordinator)

Principal

PRINCIPAL
Dr.Ghali College
Gadhinglaj,Dist.Kolhapur.

Attachment: Photos, paper news, flyer etc



Dr. S. A. Masti
(Co-ordinator IQAC)

Dr. GHALI COLLEGE Estd. 1984 GADHINGLAJ

Principal
Principal
Dr. Ghali College
Gadhinglaj, Dist. Kolhapur

(75)

## 'घाळी'मध्ये राजभाषादिनी व्याख्यान

**गडहिंग्लज :** येथील डॉ. घाळी महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त डॉ. दत्ता पाटील यांचे व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी डॉ. पाटील यांनी मातृभाषा ही ज्ञानभाषा म्हणून पुढे आल्यास तिची वाढ व विस्तार नक्कीच होईल, असा विश्वास व्यक्त केला. डॉ. नीलेश शेळके यांनी स्वागत केले. निबंध स्पर्धेतील यशस्वी प्रवीण पाटील, गौरी कुरबेट्टी, सानिया चिटणीस, पूनम मोरे, सानिका शिंत्रे, प्रणवी शिंदे या विजेत्यांना पारितोषिक वितरण झाले. वंदना खोराटे यांनी आभार मानले. दत्ता वाघमारे, विश्वनाथ पाटील, पूजा पाटील, फुलराणी रजपूत, राजश्री म्हंकावे, दयानंद पाटील, विलास प्रधान, आशुतोष परीट, राहुल वारके, महेश पाटील, प्रमोद पुजारी आदी उपस्थित होते.

दै. सकाळ, 28-02-2023

Dr. GHALI COLLEGE Estd. 1984 GADHINGLAJ

दै. पुढारी 28-02-2023

# गडहिंग्लज तालुक्यात मराठी भाषा गौरव दिन साजरा

### लोकभाषा ही ज्ञानभाषा व्हावी

मातृभाषेचे संगोपन, संवर्धन व्यवस्थित व्हायचे असेल तर मातृभाषा ही ज्ञानभाषा व्हायला हवी. जगातील सर्व भाषांतील ज्ञानभंडार मातृभाषेत उपलब्ध करुन द्यायला हवे किंबहुना उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्व विद्या शाखा यांचे मातृभाषा हे भाषिक माध्यम झाले पाहिजे, असे मत डॉ. दत्ता पाटील यांनी डॉ. घाळी कॉलेजमधील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

तालुक्यात मराठी भाषा गौरव दिन व कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस उत्साहात साजरा झाला. यानिमित्त शाळा-महाविद्यालये, संस्थांतर्फे कार्यक्रम पार पडले. ठिकठिकाणी मराठी भाषेविषयी तज्ज्ञांची व्याख्याने झाली.

येथील साधना प्रशालेत प्राचार्य जी. एस. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. प्रारंभी कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन झाले. पसायदान, श्लोक, अभंग, पोवाडा यांचे सादरीकरण झाले. तृप्ती राजमाने हिने मराठी भाषा दिनाचे, एस. एम. घोडके यांनी पिंगळा या लोककलेचे महत्त्व स्पष्ट केले. संचालक अरविंद बारदेस्कर व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. घाळी कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त घेतलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. प्रवीण पाटील, गौरी कुरबेट्टी, सानिया चिटणीस, पूनम मोरे, सानिका शिंत्रे, प्रणवी शिंदे यांना बक्षिसे देण्यात आली. प्रा. डॉ. दत्ता पाटील, डॉ. नीलेश शेळके व इतर उपस्थित होते.

गडहिंग्लज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये प्राचार्य पंडित पाटील यांच्या हस्ते वि. वा. शिरवाडकर, डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. प्रा. भानुदास माने यांनी मराठी लोकगीतांचे महत्त्व सांगितले. यावेळी प्रा. सी. व्ही. महाजन, प्रा. सुभाष लाखे, प्रा. सुरेश शिंदे व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

जागृती हायस्कूलमध्ये मराठी भित्तिपत्रिकेची स्पर्धा झाली. मुख्याध्यापक विजयकुमार चौगुले यांच्या हस्ते उद्घाटन झाले. स्पर्धेमध्ये ८० विद्यार्थी सहभागी होते. लहान गटांत चार्वी कुंभार, आर्या पाटील, अनुष्का मिरजे यांनी तर मोठ्या गटांत गायत्री पाटील-गौरी पाटील, स्वराली देसाई, संचित काळे, संस्कृती कुरळे यांनी क्रमांक मिळविले. विद्यार्थ्यांनी समूहगीत सादर केले.

**एस. एस. हायस्कूल नेसरी**

**नेसरी :** येथील एस. एस. हायस्कूल व छ. शिवाजी कॉलेजमध्ये मराठी गौरवगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रा. ए. बी. बागडी यांनी कुसुमाग्रजांचा जीवन परिचय करून दिला. ज्योती कडगावकर हिने 'मराठी भाषा संवर्धनाची गरज' या विषयावर विचार मांडले. यावेळी मुख्याध्यापक ए. डी. लोहार, उपमुख्याध्यापक एस. जे. कालकुंद्रीकर व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

**संत गजानन कॉलेज, महागाव.**

**महागाव :** येथील संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालयात प्राचार्य डॉ. संजय सावंत यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. प्रा. संभाजी चव्हाण यांनी स्वागत केले. यावेळी सर्व विभागांचे विभागप्रमुख व विद्यार्थी उपस्थित होते.

PRINCIPAL
Dr.Ghali College
Gadhinglaj,Dist Kolhapur.

Dr. S. A. Masti
(Co-ordinator IQAC)

Dr. GHALI COLLEGE Estd. 1984 GADHINGLAJ

Principal
Dr. Ghali College
Gadhinglaj, Dist. Kolhapur